**ठळक बातम्या**

- लोकसभा निवड़णुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या १०२ मतदार संघात शांततेत मतदान सुरू

- राज्यातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर मतदारसंघात ११ वाजेपर्यंत १९ टक्क्यांहून अधिक मतदान

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस

**आणि**

- नौदलाच्या पश्चिम विभागाचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल दिनेश त्रिपाठी होणार नवे नौदल प्रमुख

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाला आज सकाळी ७ वाजता शांततेत सुरवात झाली. १७ राज्य आणि ४ केंद्र शासित प्रदेशातील १०२ मतदारसंघात १ हजार ६२५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम, नागालँड, सिक्किम, अंदमान आणि निकोबार द्विपसमूह, लक्षद्विप, पुद्दूचेरी, उत्तराखंड आणि तामिळनाडूतल्या सर्व मतदार संघात आज मतदान होत आहे. राजस्थानमध्ये १२, उत्तरप्रदेशात ८, मध्य प्रदेश ६, आसाम आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येकी ५, बिहार ४, पश्चिम बंगालमध्ये ३, मणिपूर २, छत्तीसगढ, त्रिपुरा आणि जम्मू मधल्या एका जागेसाठी मतदानाला सुरुवात झाली

आहे. अरुणाचल प्रदेश आणि सिक्किम विधानसभेसाठीही आज एकाच टप्प्यात मतदान होत आहे. पहिल्या टप्प्यात देशातल्या प्रमुख उमेदवारांमध्ये केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल, जितेंद्र सिंह, किरेन रिजिजू, काँग्रेस नेते गौरव गोगोई, कार्ती चिदंबरम, तसंच द्रमुकचे दयानिधी मारन, तेलंगणच्या माजी राज्यपाल तमिलिसाई सुंदरराजन, डीएमके नेते दयानिधी मारन यांचा समावेश आहे.

या सर्व ठिकाणी मतदान यंत्रणा सज्ज असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. मतदारांसाठी पाणी, स्वच्छतागृह, तात्पुरता निवारा, या सारख्या सुविधा पुरवल्या आहेत. मतदान आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना नेण्यासाठी ४१ हेलिकॉप्टर, ८४ विशेष गाड्या आणि एक लाख वाहने तैनात करण्यात आली आहेत. मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी विविध लोकसभा मतदारसंघात ३६१ निरीक्षक तैनात करण्यात आले आहेत.

**<><><><><><>**

राज्यात आज नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघांत मतदान होत आहे. राज्यातल्या या पाच लोकसभा मतदारसंघात एकंदर ९७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून, एकंदर १० हजार ६५२ मतदान केंद्रं उभारली असल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. या पहिल्या टप्प्यात राज्यात नितीन गडकरी, सुधीर मुनगंटीवार, प्रतिभा धानोरकर, राजू पारवे, श्यामकुमार बर्वे, सुनील मेंढे, प्रशांत पडोळे, अशोक नेते, नामदेव किरसान या प्रमुख नेत्यांसह अनेक उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होणार आहे.

**<><><><><><>**

रामटेकमध्ये सर्वाधिक २८, नागपुरात २६, भंडारा-गोंदियात १८, चंद्रपूरमध्ये १५ आणि गडचिरोली-चिमूरमध्ये १० उमेदवार रिंगणात आहेत. सर्वाधिक २ हजार ४०५ मतदान केंद्र रामटेकमध्ये, २ हजार १३३ भंडारा-गोंदियात, २ हजार ११८ चंद्रपूरमध्ये, २ हजार १०५ नागपूरमध्ये आणि १ हजार ८९१ मतदान केंद्र गडचिरोली-चिमूर मतदार संघात आहेत.

या ५ लोकसभा मतदारसंघात एकूण ९५ लाख ७० हजार ७१३ मतदार आहेत. त्यापैकी ९ हजार ४१६ मतदारांनी टपालाद्वारे तर ६ हजार ६३० जणांनी घरुन मतदानाचा पर्याय स्वीकारला आहे. सर्वाधिक २२ लाख २५ हजारांहून अधिक नागपूरमध्ये तर सर्वात कमी १६ लाख १९ हजारांहून अधिक गडचिरोली-चिमूरमध्ये आहेत.

**<><><><><><>**

राज्यातल्या ५ लोकसभा मतदारसंघात सकाळी ११ वाजेपर्यंत सरासरी १९ पूर्णांक १७ शतांश टक्के मतदान झालं होतं. सर्वाधिक २४ पूर्णांक ८८ शतांश टक्के मतदान गडचिरोली-चिमूरमध्ये झालं. भंडारा-गोंदियात १९ पूर्णांक ७२ शतांश टक्के, चंद्रपूरमध्ये १८ पूर्णांक ९४ शतांश टक्के, नागपूरात १७ पूर्णांक ५३ शतांश टक्के, रामटेकमध्ये १६ पूर्णांक १४ शतांश टक्के मतदान झालं.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत रामटेकमध्ये ६२ पूर्णांक ७ शतांश, नागपूरमध्ये ५२ पूर्णांक ७ दशांश, भंडारा गोंदियात ६८ पूर्णांक ३१ शतांश, चंद्रपूरमध्ये ६४ पूर्णांक ६५ शतांश आणि गडचिरोली-चिमूरमध्ये सर्वाधिक ७१ पूर्णांक ९८ शतांश टक्के मतदान झालं होतं.

नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विकास ठाकरे, सुनिल मेंढे, प्रशांत पडोळे, संजय कुंभलकर, नामदेव किरसान, राजू पारवे, चंद्रशेखर बावनकुळे,

हंसराज अहिर, विजय वडेट्टीवार, सरसंघचालक मोहन भागवत, विलास मुत्तेमवार, धर्मरावबाबा आत्राम, डॉ.देवराव होळी, कृष्णा गजबे यांच्यासह अनेक मान्यवरांनी आज सहपरिवार मतदानाचा हक्क बजावला.

**गडचिरोली** शहरात नवमतदार, दिव्यांग, वृध्द मतदारांची मतदार रथामध्ये बसवून वाजत गाजत मिरवणूक काढून मतदान केंद्रापर्यंत नेण्यात आलं. खबरदारीचा उपाय म्हणून गडचिरोली जिल्ह्यातल्या सिरोंचा इथ पोलिसांनी हेलिकॉप्टरच्या सहाय्यानं ३ अतिरीक्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र पाठवली. वेळेवर बिघाड झाला तर ही मतदान यंत्र वापरण्यासाठी राखीव आहेत.

**भंडारा** जिल्ह्यातल्या मोहाडी तालुक्यातल्या खुशारी गावात श्रीहरी गायधने या वरानं लग्न करण्यापूर्वी मतदानाचा हक्क बजावला. भंडारा जिल्ह्यात बेला इथल्या मतदान केंद्रावर उभारलेल्या सेल्फी पॉइंटवर मतदार गर्दी करत आहेत.

**रामटेक** तालुक्यातल्या कट्टा इथं एका मतदान केंद्र बांबू आणि वन आधारित संकल्पनेवर उभारलं आहे. नागपुरात शंकर नगरातलं एक मतदान केंद्र वस्त्रोद्योग या थीमवर आधारित आहे. याठिकाणी हातमागाचं कापड आणि विविध कलाकृतीचं प्रदर्शन मांडलं आहे.

**चंद्रपुरातही** एका वरानं लग्नापूर्वी मतदानाचा हक्क बजावला.

**गडचिरोलीचे** पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी आज गडचिरोली इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरपालिका शाळेत मतदान केलं. त्यानंतर त्यांनी मतदारांना निर्भीडपणे मतदान करण्याचं आवाहन केलं..

**होल्ड बाईट...(७ सेकंद)**

**<><><><><><>**

**राज्यातल्या** ५ लोकसभा मतदारसंघात दुपारी १ वाजेपर्यंत सरासरी ३२ पूर्णांक ३६ शतांश टक्के मतदान झालं होतं. सर्वाधिक ४१ टक्के मतदान गडचिरोली-चिमूरमध्ये झालं. भंडारा-गोंदियात ३४ पूर्णांक ५६ शतांश टक्के, चंद्रपूरमध्ये सुमारे ३१ टक्के, नागपूरात २८ पूर्णांक ७५ शतांश टक्के, आणि रामटेकमध्ये २८ पूर्णांक ७३ शतांश टक्के मतदान झालं.

**<><><><><>**

तिसऱ्या टप्प्यातल्या १२ राज्य आणि केंद्र शासित प्रदेशातल्या ९४ लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरायचा आज शेवटचा दिवस आहे. राज्यातल्या **रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि हातकणंगले** या ११ मतदारसंघात या टप्प्यात ७ मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात नारायण राणे, विनायक राऊत, सुनील तटकरे, अनंत गीते, सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, प्रणिती शिंदे, उदयनराजे भोसले, छत्रपती शाहू महाराज यांच्यासारखे प्रमुख उमेदवार या टप्प्यात उमेदवारी रिंगणात आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या आजच्या मतदानाचा आढावा घेणारा ‘मतदानाचा मागोवा’ हा विशेष रेडिओ ब्रिज कार्यक्रम आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागातर्फे आज सादर करण्यात येणार आहे. संध्याकाळी सव्वा आठ वाजता आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज सायंकाळी वर्धा जिल्ह्यात तळेगाव इथं प्रचार सभा होणार आहे. महायुतीचे खासदार रामदास तडस

तिसऱ्यांदा या मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत. मोदी यांची उद्या २० एप्रिलला नांदेड आणि परभणी इथं प्रचारसभा होणार आहे.

**<><><><><><>**

नौदल उपप्रमुख, व्हाइस ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांची भारतीय नौदलाचे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान नौदल प्रमुख ॲडमिरल आर हरी कुमार या महिन्याच्या ३० तारखेला निवृत्त होणार आहेत. संपर्क आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध तज्ज्ञ असलेले त्रिपाठी यांनी पश्चिम नौदल कमांडचे ध्वज अधिकारी, मुख्य कमांड अधिकारी म्हणूनही काम केलं आहे. त्रिपाठी यांनी विनाश, किर्च आणि त्रिशूल या भारतीय नौदलाच्या जहाजांचं नेतृत्व केलं आहे.

**<><><><><><>**

केनियामध्ये एका हेलीकॉप्टर दुर्घटनेत केनियाचे लष्कर प्रमुख जनरल फ्रांसीस ओंगोलो यांच्यासह १० जणांचा मृत्यू झाला आहे. राष्ट्रपती विलियम रुटो यांनी ही माहिती दिली. या दुर्घटनेमुळे केन्यामध्ये तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. जनावरांची तस्करी रोखण्याच्या मोहिमेवर जनरल ओंगोलो निघाले असता ही दुर्घटना झाली.

**<><><><><><>**

पॅलेस्टाईनला संयुक्त राष्ट्र संघाचं पूर्ण सदस्यत्व बहाल करण्याच्या सुरक्षा परिषदेच्या ठरावाला नकाराधिकाराचा वापर करत अमेरिकेनं विरोध केला आहे, १५ सदस्यीय सुरक्षा परिषदेच्या १२ सदस्यांनी ठरावाच्या बाजूनं मतदान केलं, तर ब्रिटन आणि स्वित्झर्लंड हे दोन देश अलिप्त राहिले.

**<><><><><><>**

इराणने आज सकाळी इस्त्रायलच्या इसफहान शहराजवळ  हवाई संरक्षण क्षेपणास्त्रे डागली. याआधी सीरियातील इराणी दूतावासावर झालेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी इराण ने इस्त्रायलवर ड्रोन हल्ला केला होता. त्याला प्रत्युत्तर म्हणून काही दिवसांनी इस्त्रायल ने  इराणच्या इस्फहान शहरात ड्रोनने हल्ला केला होता.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना होणार आहे. लखनौच्या एकना क्रिकेट स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. दरम्यान काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं पंजाब किंग्जचा ९ धावांनी पराभव केला.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेने यावर्षी उन्हाळ्याच्या हंगामासाठी विक्रमी नऊ हजार एकशे ११ रेल्वे गाड्याच्या फेऱ्याचं नियोजन केलं आहे. गेल्या वर्षी  उन्हाळ्यात रेल्वेच्या एकूण सहा हजार तीनशे एकोणसत्तर  फेऱ्या झाल्या होत्या. यंदा त्यात २ हजार ७४२ फेऱ्यांची भर पडली आहे. महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात, ओडिशा, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, झारखंड, राज्यांतील गर्दी लक्षात घेत  सर्व विभागीय रेल्वेने या अतिरिक्त फेऱ्या चालवण्याची तयारी केली आहे.

**//<><><><><>//**